# वास्तुशास्त्र आणि धातूचे महत्त्व

**बबनराव पाटील**

**धातूंचा प्रयोग हा प्राचीन काळापासून दैनंदिन जीवनात होत आहे. इतिहासातही सुवर्ण, रौप्य, तांबे, पितळ, कांस्य या धातूंचा उल्लेख वारंवार आढळतो. लोहस्तंभ, सुवर्णतुला, रजतपात्रे ताम्रपत्रावरील लेख यांचा उल्लेख इतिहासात सर्वत्र आढळतो. धातूची भांडी, देवदेवतांच्या प्रतिमा तसेच अलंकारांच्या माध्यमातून ते आपल्या उपयोगात येतात. इतकंच काय सुवर्णभस्म. ताम्रभस्म, लोहभस्म, रौप्यभस्म या रूपांत धातूंचा औषधी प्रयोग प्राचीन काळापासून आजतागायत होतच आहे.**

वास्तुशास्त्र म्हणजे वास्तूचे शास्त्र. ज्यात वास करायचा ती वास्तू. या वास्तूच्या रचनेचे शास्त्र. वास्तूची रचना अशी असावी की शुभ ऊर्जालहरींचा, शुभ स्पंदनांचा वास त्या वास्तूत व्हावा. अशुभ ऊर्जालहरींपासून वास्तूचे संरक्षण व्हावे. वास्तुशास्त्रात केवळ वास्तूच्या बांधकाम तंत्राचाच अभ्यास नसून वास्तुशुभतेस प्राधान्य दिले आहे.

वास्तूशास्त्राचा संबंध आहे अष्ट दिशांशी, दिशानुरूप असणाऱ्या ऊर्जाप्रवाहांशी आणि पंचमहाभौतिक आविष्काराशी.

**दिशा व द्विऊर्जाप्रवाह**

जमिनीवरून वाहणारी ऊर्जा ही ब्रह्माण्डलहरी आणि विद्युत चुंबकीय लहरींच्या रूपात असून वास्तूच्या प

वास्तूच्या ईशान्येस जलतत्त्व, आग्नेयेस अग्नितत्त्व, नैऋत्येस पृथ्वीतत्त्व, वायव्येस वायुतत्त्व व ज्याला ब्रह्मस्थान म्हणतात तेथे आकाशतत्त्व विराजमान असते.


प्रायोगिकदृष्ट्या ईशान्य प्रभाग हा जलतत्त्वाचा म्हणून पाण्याचा साठा, अंडरग्राउंड टाकी याकरिता तसेच मोकळा भाग स्वच्छ, पवित्र म्हणून देवघर, ध्यानधारणा, अभ्यास याकरिता सर्वोत्तम मानला आहे. आग्नेय प्रभागात अग्नितत्त्वाचे किचन प्राधान्याने पृथ्वीतत्त्वाच्या नैऋत्य कोपऱ्यात स्थैर्य व शांतता प्रदान करणारे घरमालकाचे शयनकक्ष तर वायव्येस वायुतत्त्वास प्राधान्य देऊन उपवर मुली, पाहुण्यांकरिता जागा असावी.

ऊर्जाप्रवाह व पंचमहाभूते यांना अनुसरून घर असल्यास त्याचे शुभ परिणाम दिसतात. परंतु आज फ्लॅट संस्कृतीत तर घराच्या आकारातच काय पण अंतर्गत रचनेतही कमालीची विषमता आढळते. कोणता ना कोणता कोपरा कट असतोच. कोपऱ्यातून दरवाजा, नको तेथे किचन, नको तेथे पाण्याची टाकी, टॉयलेट, बेडरुम अशी परिस्थिती असते. यातून निर्माण होणाऱ्या वास्तुदोष निवारणाकरिता प्रत्येक वेळी तोडफोड करणे शक्य नसते.

विनातोडफोड उपाययोजना करायच्या झाल्यास प्रामुख्याने रत्नाध्याय, धातू, पिरॅमिड, रंगशास्त्र, विविध वास्तुयंत्रे यांचा कल्पकतेने वापर केला जातो. यांपैकी रत्नांचा प्रयोग काहीसा खर्चीक असला तरी धातू, पिरॅमिड व वास्तुयंत्राचा वापर हा सामान्य माणसासही परवडणारा आहे.

धातूंचा प्रयोग हा प्राचीन काळापासून दैनंदिन जीवनात होत आहे. इतिहासातही सुवर्ण, रौप्य, तांबे, पितळ, कांस्य या धातूंचा उल्लेख वारंवार आढळतो. लोहस्तंभ, सुवर्णतुला, रजतपात्रे ताम्रपत्रावरील लेख यांचा उल्लेख इतिहासात सर्वत्र आढळतो. धातूची भांडी, देवदेवतांच्या प्रतिमा तसेच अलंकारांच्या माध्यमातून ते आपल्या उपयोगात येतात. इतकंच काय सुवर्णभस्म. ताम्रभस्म, लोहभस्म, रौप्यभस्म या रूपांत धातूंचा औषधी प्रयोग प्राचीन काळापासून आजतागायत होतच आहे.

वास्तुदोषनिवारण व वास्तुगुणोत्कर्षाकरिता धातूंचा वापर मोठ्या प्रमाणावर करता येतो. वास्तुशास्त्रातील धातुप्रयोग पाहण्यापूर्वी दिशा व त्यांच्या कारक धातुंचा संबंध दर्शवणारी आकृती पाहू या.




उच्चतम गुणोत्कर्ष असणारी उत्तर दिशा, जलतत्त्वाची दिशा, शीतत्व प्रदान करणाऱ्या सोमदेवतेचे स्थान, निर्मळ शांतता, प्रसन्नता, पावित्र्याची, श्वेतवर्ण, लघुत्वयुक्त सात्त्विक दिशा. या दिशेचे विकसन करून अत्याधिक जैविक ऊर्जेचा लाभ वास्तूस लाभतो. म्हणूनच की काय श्वेतवर्णीय व लघुत्वयुक्त चांदी तसेच जस्त धातूचा प्रयोग उत्तरेस लाभदायी मानला आहे. याउलट ऋण ऊर्जाप्रभारित दक्षिण दिशा पृथ्वीतत्त्वाची, जडत्वाची दिशा, जैविक ऊर्जेची अस्त दिशा. या दिशेचे अधिकाधिक आकुंचन होणे आवश्यक आहे. ज्यामुळे ऋण ऊर्जांपासून वास्तूस संरक्षण लाभावे. शिसे हा जडत्व गुण असणारा धातू या प्रभागात वापरणे श्रेयस्कर ठरते. शनीच्या मंदगती व संकोचक गुणांना अनुलक्षून नीलम रत्न व धातूंमध्ये शिशाचा प्रयोग उपयुक्त ठरतो. दक्षिण हे मंगळाचाही अंमल असणारे स्थान असल्यामुळे ताम्रधातूचा प्रयोगही शास्त्रकारांनी या दिशेस सांगितला आहे. सूर्याचे सर्वशक्तिमान स्वरूप असणारी दिशा म्हणजे पूर्व. तेजाची दिशा, रक्तवर्णाची दिशा म्हणूनच अग्निबीज प्रतीत होणाऱ्या ताम्रधातूची योजना या दिशेस केली आहे. ऊर्जेचा श्रेष्ठ संवाहक म्हणून ताम्रधातूस अनन्यसाधारण महत्त्व आहे. रवी, मंगळाचा प्रभाव असणाऱ्या या दिशेस आपल्या

स्वगुणांमुळे ताम्रधातूचा सर्रास उपयोग केला जातो. पूर्वेच्या प्राणिक ऊर्जांना प्रस्फुरण देण्याचे महत्त्वाचे कार्य ताम्रधातूमुळे साध्य होते. उत्तर दिशेप्रमाणेच पूर्वेसही चांदीचा प्रयोग पूर्वप्रवाहांना गती देणारा आहे.

प्राणिक ऊर्जेची अस्त दिशा म्हणजे पश्चिम दिशा. या दिशेचा संकोच करून पूर्वेचे विकसन करता येते. नीलवर्णाच्या मात्रेने तसेच संकोच व जडत्व (गुरुत्व) प्रदान करणाऱ्या शिसे धातूच्या संस्काराने या दिशेची शुभ फळे उपभोगणे शक्य आहे. ब्राँझ (कांस्य) धातूच्या प्रयोगाने येथील नीलवर्णमात्रा वृद्धिंगत होते. नीलहंडी, नीलस्फटिकांचा वापरही पश्चिमेच्या संकोचासाठी हितावह ठरतो.

श्वेत, शुभ्रवर्ण, शीतलत्व या गुणप्रकर्षामुळे चांदी (रौप्य) जलतत्त्वयुक्त उत्तर, पूर्वेस तसेच ईशान्येसही प्रशस्त आहे. याच गुणांमुळे शीतल वायुकारकत्व असणाऱ्या वायव्येसही चांदी लाभदायी ठरते.

अग्निबीज धारण करणाऱ्या ताम्रधातूचा प्रयोग पूर्व व दक्षिणेप्रमाणे साक्षात अग्नितत्त्वाचे स्थान असणाऱ्या आग्नेयेसही निश्चितच फलदायी आहे.

अस्त दिशांचा संकोचक व गुरुत्व धारण करणाऱ्या शिशाचा उपयोग दक्षिण व पश्चिमेप्रमाणे नैऋत्येस करूनही ऊर्जाप्रवाहांचे संतुलन साधता येते.

वास्तूमध्ये वरील धातूंचा प्रयोग कशा प्रकारे करावा याचे सविस्तर कथनही शास्त्रकारांनी केले आहे. उत्तरेस गुरूच्या होऱ्यात जस्त धातूची स्थापना करावी. पूर्वेस मंगळाच्या होऱ्यात ताम्र धातूची दक्षिणेस शनीच्या होऱ्यात शिशाची, पश्चिमेस बुधाच्या होऱ्यात ब्राँझ (कांस्य) धातूची स्थापना करावी. सामान्यतः सूर्योदयापश्चात एक तासाचा काळ हा गुरुवारी गुरूचा, मंगळवारी मंगळाचा, शनिवारी शनीचा व बुधवारी बुधाचा होरा असल्याने या काळात धातुस्थापना करणे शक्य आहे.

उत्तर-पूर्व-पश्चिम-दक्षिण या चारही दिशांतील धातूंचे प्रमाण १:२:४:८ असे आहे. म्हणजेच उत्तरेस १०० ग्रम जस्त पुरल्यास पूर्वेस २०० ग्रॅ. ताम्र पुरावे, पश्चिमेस ४०० ग्रॅ. कांस्य तर दक्षिणेस ८०० ग्रॅ. शिसे पुरावे. प्लॉटकरिता वापरण्यात येणाऱ्या धातुप्रमाणाच्या निम्म्या प्रमाणात घरातही धातुस्थापना करावी.

सौरमालेत रवीचे स्थान मध्यभागी आहे. तद्वत वास्तूत ब्रह्मस्थानात रवीचे स्थान सांगितले आहे. तेजोमय रवीच्या ब्रह्मस्थानी तेजयुक्त सुवर्ण पुरावे.

थोडक्यात जेथे जेथे श्वैत्य आणि शैत्य वाढवून जैविक व प्राणिक ऊर्जाप्रवाह करायचे तेथे तेथे चांदी, जस्त यांचा उपयोग करावा. उलटपक्षी जेथे जेथे जडत्व, गुरुत्व, संकोच अपेक्षित आहे तेथे शिसे, ब्रांझ धातूची स्थापना करावी आणि जेथे तेजस्वी अग्निबीज साकारायचे तेथे तांब्याचा प्रयोग उपयुक्त मानला आहे. ऊर्जासंवहनास प्रेरक आणि प्रबंधक धातूंच्या कारकत्वाचे ज्ञान शास्त्रकारांना पूर्वीपासूनच होते. ऊर्जेचा श्रेष्ठ संवाहक असणाऱ्या ताम्रधातूचा विजेच्या वहनाकरिताचा शोध हल्लीचा परंतु ताम्रधातूतील संशुद्धक अग्निबीज शास्त्रकारांना चांगलेच ज्ञात होते हे अभ्यासाअंती लक्षात येते.

धातूंना जमिनीत पुरून त्यांची स्थापना करण्याबरोबरच त्या धातूंपासून बनविलेली अनेक वास्तुयंत्रे वास्तुदोष निवारणाकरिता वापरली जातात. धातूंबरोबरच त्या त्या दिशांची तत्त्वे, तत्त्वांनुरूप रंग, आकार, रत्ने, प्रतीके यांचा कलात्मक वापर करून साकारलेली निरनिराळी वास्तुयंत्रे प्रयोगात आणता येतात.

पूर्वदोषनिवारण करून गुणोत्कर्ष घडवण्याकरिता लाकडाच्या (तत्त्व - लाकूड), गजमुखात तांब्याचे दन्त (धातू), पोवळ्याचे नेत्रद्वय (रत्न), सुवर्णजडित मुकुटात माणिक (रविरत्न) योजून साकारलेल्या गजाननास रक्तवर्णीय वस्त्र व फूल (रंग) वापरून तुपाचा दिवा (तेजतत्त्व) लावल्याने अवतरणारे पूर्वयंत्र म्हणजेच कला व शास्त्र यांचा अद्भुत आविष्कारच होय.

रौप्यपात्रातील (धातू-श्वेतवर्ण), शिवस्वरूप स्फटिक (उपरत्न) त्यावर ताम्रघटातून (धातू) अखंड जलाचा (तत्त्व) अभिषेक व पार्श्वभूमीवर आरशावर रेखांकित केलेले श्रीयंत्र असे शिवशक्तिस्वरूप 'ईशान्यपात्र' ईशान्येतील गुणांना पुलकित करते.

दक्षिणेकडील वास्तुदोष नेस्तनाबूत करून जैविक व प्राणिक प्रवाहांचे संतुलन राखण्याकरिता दक्षिण भिंतीवर लावलेले 'भौमयंत्र' ताम्रधातूत घडवलेले आहे.

प्राणिक ऊर्जेची अस्त दिशा असणाऱ्या पश्चिमेस ब्राँझ (कांस्य धातू) व नीलस्फटीक (उपरत्न, नीलवर्ण) यातून साकारलेले 'शनितारका यंत्र' म्हणजेच पश्चिमयंत्र.

स्वस्तिक यंत्राचा प्रयोग वास्तुगुणोत्कर्षाकरिता होतो. रत्नाध्यायामध्येही रत्नांचे अधिष्ठान म्हणून स्वस्तिक यंत्राचे महत्त्व आहे. हं, सं, शं, षं या मंत्रबीजांनी युक्त स्वस्तिकयंत्र ताम्रपत्रावर बनविले जाते.

वरील वास्तुयंत्राबरोबरच मंत्रबीज पिरॅमिड्सचा प्रयोग हा अतिशय उपयुक्त पर्याय वास्तुदोषनिवारणाकरिता वापरतात. ताम्रधातूच्या पृथ्वीतत्त्वस्वरूप त्रिकोणीकृती पिरॅमिड्सच्या तळाशी ।।ऱ्हीं।। तर वायुतत्त्वस्वरूप गोलाकार पिरॅमिड्सच्या तळाशी

।।पं।। या मंत्रबीजांचा संस्कार करून पाच नद्यांची वाळू पिरॅमिड्समध्ये भरली जाते. मंत्र, बीजाक्षर, ताम्रधातू, पाच नद्यांची वाळू, पंचमहाभूतात्मक आकार या सगळ्यांचा संगम असणाऱ्या पिरॅमिड्सची स्थापना घरात केल्यास पंचमहाभूते व दिशा यांचे उत्तम संतुलन राखता येते.

विविध वास्तुयंत्रे, पिरॅमिड्स, जमिनीमधील धातुस्थापना यांबरोबरच तांबे, पितळ, चांदी इत्यादी धातूंची योजना, मंगल कलश, देवदेवतांच्या प्रतिमा, ताम्र-रजतपत्रावरील विविध ग्रहांची यंत्रे, विविध शुभचिन्हांकित प्रतिमा (स्वस्तिक, सूर्यनारायण, अश्व, गज, कामधेनू, गोपद्म, शंख, चक्र इत्यादी) व पूजेच्या साहित्याकरिता करून वास्तुशुभता साधता येते.

कोणताही धातू हा आपल्याला भूगर्भातून मिळतो. त्यावर अनेक प्रक्रिया करून सिद्ध झाल्यावरच तो वापरात आणला जातो. वातावरणातील सत्त्व, रज, तम अशा त्रिगुणलहरींपैकी वातावरणातील सत्त्वलहरी ग्रहण करण्याची क्षमता तांबे, पितळ, चांदी, सुवर्ण या धातूंमध्ये आहे. सोने, चांदी या धातूंमध्ये सत्त्वलहरी ग्रहण करण्याची क्षमता अधिक आहे. या धातूंच्या दर्शनानेसुद्धा प्रसन्नता लाभते, सात्त्विक भावजागृती होते.

शास्त्रकारांनी वास्तुगुणोत्कर्षाकरिता सांगितलेला धातूंचा प्रयोग निश्चितच उपकारक आहे.

वास्तुशास्त्रीय वास्तुयंत्र, पिरॅमिड्स, मंगल कलश, देवदेवतांच्या प्रतिमा तसेच निरामय आयुष्याकरिता तांब्या-पितळेच्या भांड्यांचा वापर या दोन्ही बाबतीत ती स्वच्छ आणि चकचकीत असणे अतिशय आवश्यक आहे. हवामानातील आर्द्रतेमुळे तांब्या-पितळ्यांच्या पृष्ठभागावर ऑक्साइडचा थर जमा होऊ लागतो. हा थर काढून टाकावा लागतो. त्याशिवाय तांब्या-पितळ्यांच्या गुणधर्मांचा लाभ होत नाही.

पूर्वी ही भांडी स्वच्छ करण्याकरिता चिंच, ताक, लिंबू यांसारख्या आम्लधर्मी पदार्थांचा वापर केला जात असे किंवा राख, माती यासारख्या सहज उपलब्ध पदार्थांनी ती घासली जात असत पण या पारंपरिक पदार्थांमधील आम्ल सौम्य असल्याने चिवट व जुने डाग पूर्णपणे जात नाहीत. राख, माती यांतील खरखरीत घटकांमुळे भांड्यावर चरे पडतात आणि आता हे दोन्ही पदार्थ सहज उपलब्धही नाहीत. '**पितांबरी**'सारख्या पावडरच्या वापराने ही समस्या नष्ट होते. याने भांडी सहज घासून लख्ख होतात. त्यावर चरेही पडत नाहीत व चमक टिकून राहते. **पितांबरी प्रॉडक्टस**चेच दुसरे एक उत्पादन '**रुपेरी**' याने चांदीची भांडी लखलखीत होतात.

दगड, माती, लाकूड यापासून बनलेली पात्रे, वस्तू प्राचीन मानव वापरीत असे. यानंतर तांबे, पितळ, लोखंड यांसारख्या विविध धातूंचा प्रयोग होऊ लागला. सध्याच्या गतिमान जीवनप्रवाहामुळे स्टील, काच, प्लॅस्टिकचा वापर अधिकाधिक होऊ लागला आहे. परंतु तांबे, पितळसारख्या धातूंचे महत्त्व आधुनिक जगानेही मान्य करून सध्या तर या धातूच्या वापराकडे लोकाचा कल वाढत आहे. अर्थातच ही धातूंची पात्रे, देवदेवतांच्या प्रतिमा, विविध वास्तुयंत्र यांच्या स्वच्छतेची, चकाकीची जिकिरीची जबाबदारी '**पितांबरी प्रॉडक्टस प्रा. लि.**'ने मोठ्या शिताफीने उचलून कोणताही दुष्परिणाम होणार नाही अशी अभिनव उत्पादने ग्राहकांच्या सेवेत बाजारात उपलब्ध करून वेळ, पैसा आणि श्रम यांची बचतच केली आहे.

सूर्यनारायण प्रतिमा (पूर्वयंत्र)

- बबनराव पाटील (वास्तुमार्गदर्शक)
१, वैष्णव निवास, आकुर्ली क्रॉस रोड नं. २,
कांदिवली (पूर्व),
मुंबई - ४००१०१
फोन : ९८२१३१८५५२ / ०२२-२८८५२१०८
९८६७१५८३८० / ९९६७३८५०५९